# सहकार प्रशिक्षण कार्यक्रम

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४-क नुसार सर्व प्रकारच्या सहकारी संस्थाना त्यांचे संचालक मंडळ, सभासद तसेच कर्मचारी यांचे प्रशिक्षण मान्यताप्राप्त प्रशिक्षण संस्थांकडून घेणे व कलम ७५(२) (viii) नुसार अंदाजपत्रक तयार करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे कलम ३०-क (८) नुसार सहकारी संस्थांचे अंदाजपत्रक तयार करणे, दरवर्षी प्रशिक्षणासाठी आर्थिक तरतूद करणे व सदर तरतूद प्रशिक्षण घेण्यासाठी खर्च करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४-क(१) ला अनुसरून दिनांक १० सप्टेंबर २०१४ रोजीच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील अधिसूचनेनुसार यशदा पुणे या संस्थेला राज्यस्तरीय संस्था म्हणून मान्यता देण्यात आली आहे. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे परिपत्रक क्र. प्रशासन/ कलम-२४ क-शिक्षण व प्रशिक्षण/२०१५/१३२, दिनांक १५/०५/२०१५ मध्ये प्रशिक्षण संबंधित उपरोक्त उल्लेखित बाबी स्पष्ट केलेल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर सहकार प्रशिक्षण व संशोधन केंद्र, यशदा पुणे कडून खालील नऊ (०९) प्रशिक्षण कार्यक्रम पुढील तिमाहीच्या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत-

| **अ.क्र.** | **प्रशिक्षण कार्यक्रमाचे शिर्षक** | **प्रशिक्षण कार्यक्रमांचे कालावधी (पासून ते पर्यंत)** |
|---|---|---|
| १ | नागरी / पगारदार सहकारी पतसंस्था व नागरी सहकारी बँका / जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांच्यासाठी **‘व्यवस्थापन विकास प्रशिक्षण कार्यक्रम’** | **०४/०१/२०१७ ते ०६/०१/२०१७** |
| | | **१७/०१/२०१७ ते १९/०१/२०१७** |
| | | **०१/०२/२०१७ ते ०३/०२/२०१७** |
| | | **०६/०२/२०१७ ते ०८/०२/२०१७** |
| | | **१३/०२/२०१७ ते १५/०२/२०१७** |
| | | **२१/०२/२०१७ ते २३/०१/२०१७** |
| | | **०६/०३/२०१७ ते ०८/०३/२०१७** |
| | | **०९/०३/२०१७ ते ११/०३/२०१७** |
| | | **२१/०३/२०१७ ते २३/०३/२०१७** |

संपर्कासाठी पत्ता - संचालक ,

सहकार प्रशिक्षण व संशोधन केंद्र, राजभवन आवार, बाणेर रोड, यशदा पुणे-४११००७.

दूरध्वनी क्र. ०२०-२५६०८१३९, ०२०-२५६०८२२४, भ्रमणध्वनी क्र. ९४२११४३३९९.

Email- ctr@yashada.org

(प्रशिक्षण कार्यक्रमांच्या कालावधीत फेरबदल करण्याचा अधिकार व्यवस्थापनाला राहील)